**शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द तक्रारी.**

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील प्रस्तावावरील कार्यवाहीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : वशिअ- १३१४/प्र.क्र.८५/११
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ जुलै, २०१५

संदर्भ : (१) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक:सीडीआर-२०८०/सी- १६१४/३७७/११, दिनांक १२ मार्च,१९८१.
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : वशिअ- १३१४/प्र.क्र.८५/११, दिनांक : ३ मार्च, २०१५.

शासन परिपत्रक :

संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध लाचलुचपत/ भ्रष्टाचाराबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांच्या उघड चौकशीस मंजुरी देण्यासंबंधीच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि विभाग प्रमुख असलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द गुप्त प्राथमिक चौकशीच्या आधारे उघड चौकशी करण्याची आवश्यकता असल्यास सचिव, गृह विभाग यांनी मुख्य सचिव यांच्यामार्फत प्रस्ताव सादर करुन मा.मुख्यमंत्री यांचे आदेश घेणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग यांना तसे कळविण्यात येते. अखिल भारतीय सेवेतील अधिकारी व विभाग प्रमुख यांच्या व्यतिरिक्त गट- "अ" मधील अधिकाऱ्यांविरुध्दच्या भ्रष्टाचार विषयक तक्रारीसंदर्भात उघड चौकशीसाठी महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग किंवा विभाग प्रमुख यांनी व्यक्तिश: प्रकरण तपासून आणि उघड चौकशीस आवश्यक ते पुरावे असल्याची खात्री असल्यास सचिव, गृह विभाग यांची सहमती प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. याबाबत आणखी असेही कळविण्यात येत आहे की, <u>वरील संवर्गातील अधिकाऱ्यांविरुध्द (अ.भा.से. विभाग प्रमुख,गट अ मधील अधिकारी) उघड चौकशीची कार्यवाही करताना अपर मुख्य सचिव (गृह) विभाग यांनी प्रस्ताव शासनास सादर करण्यापूर्वी संबंधित अधिकारी ज्या</u>

<u>प्रशासकीय विभागात कार्यरत आहे त्या प्रशासकीय विभागाच्या प्रमुखाचे अभिप्राय प्राप्त करुन विचारात घ्यावेत.</u>

०२. राज्य शासनाच्या गट-ब, गट-क आणि गट-ड संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांसंदर्भात लाचलुचपतविषयक तक्रारी प्राप्त झाल्यास, तक्रारीमध्ये नमूद केलेल्या बाबींमध्ये तथ्य आहे किंवा कसे ही बाब नियुक्ती / सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रथम तपासावी. तक्रारीमध्ये त्यांना तथ्य आढळल्यास लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत गुप्त चौकशी करण्यात यावी आणि उघड चौकशी करण्याइतपत आवश्यक ते पुरावे असल्याची खात्री असल्यास अशा कर्मचाऱ्याविरुध्द उघड चौकशीची कार्यवाही करण्यात यावी. उघड चौकशीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अशा प्रत्येक प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सक्षम /नियुक्ती प्राधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेऊन पुढील कार्यवाही करावी, अशा सूचना आहेत. याबाबत आणखी असेही कळविण्यात येत आहे की, <u>अशा प्रकारची कार्यवाही करताना निर्णय घेण्यापूर्वी सक्षम प्राधिकारी/नियुक्ती प्राधिकारी यांनी संबंधित कर्मचारी ज्या पदावर कार्यरत आहेत त्या पदाचे संवर्ग नियंत्रक अधिकारी यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेऊन ते ही विचारात घ्यावेत.</u>

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.भगवान सहाय) १६.०६.१५

अपर मुख्य सचिव (सेवा)

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) मुख्य सचिव,
४) शासनाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
५) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) महालेखापाल (ले. व अ.) महाराष्ट्र-१,मुंबई.
७) महालेखापाल (ले. व अ),महाराष्ट्र-२,नागपूर.
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी,मुंबई.

१०) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई
११) *प्रबंधक, उच्च न्यायालय(अपील शाखा),मुंबई.
१२) *प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
१३) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१४) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वरळी,मुंबई.
१७) सर्व विभागीय आयुक्त,
१८) सर्व जिल्हाधिकारी,
१९) मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख.
२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई ( ५ प्रती),
२१) विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२२) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने.
२३) निवड नस्ती.

* पत्राने.

----------